लोकमत

# जिल्हाधिकारी कार्यालयावर सेनेची कमान

## एकनाथ शिंदे यांच्या स्वागताला फलक : भिंतीवरही फलक

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** राज्याचे नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांचा गुरुवारी पूर्वनियोजित दौरा होता. त्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांच्या स्वागतासाठी चक्क जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर शिवसेनेने कमान लावली आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भिंतीवरही शिवसेनेने फलक लावले आहेत. त्यांना असे फलक लावण्यासाठी कोणी परवानगी दिली, हा चर्चेचा विषय ठरला आहे.

मंत्री शिंदे यांचा गुरुवारी नियोजित दौरा होता. नगरपालिका आणि महापालिकेच्या कामाकाजाशी संबंधित ते बैठका घेणार होते. मात्र, त्यांचा गुरुवारचा दौरा रद्द झाला असून ते आता शुक्रवारी येणार आहेत. दरम्यान, मंत्री शिंदे येणार असल्याने शिवसेनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कमानीवरच शिंदे यांच्या स्वागताचे फलक लावले आहेत. एरवी



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर अशा कमानी लावल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात उपोषण करण्यास, फलक लावण्यास मनाई करण्यात आलेली आहे. तरीही प्रशासकीय इमारतीवरच फलक लावल्याने आश्चर्य व्यक्त झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरही चकाचक करण्यात आला होता. जिल्हाधिकारी हेच सध्या महापालिकेचे प्रभारी आयुक्त आहेत. त्यामुळे हे फलक हटविणार का ? याकडे लक्ष लागले आहे. शासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावर असे फलक लावण्यास प्रशासनाने मनाई केलेली आहे. जिल्हा निवडणूक शाखेच्या भिंतीवरही असे फलक झळकले आहेत. शिवाय फलक लावण्यासाठी शिवसेनेची चढाओढ लागलेली आहे. जागा निश्चित करण्यासाठी आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी हे फलक लावण्यात व्यस्त आहेत.

जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या हेलिपॅाडवर मंत्री शिंदे यांचे आगमन होणार असल्याने पोलीस मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावरही फलक लावण्यात आले असून या फलकांवर महापालिका कारवाई करणार का ? याकडे लक्ष लागले आहे.

लोकमत

नोव्हेंबरपासून निधी नाही : जिल्ह्यातील १०५१ कलावंतांची उपासमार

# वृद्ध कलावंतांचे ७१ लाखांचे अनुदान थकले

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** वृद्ध साहित्यिक व कलावंतांना राज्य शासनाकडून देण्यात येणारे मानधन गेल्या तीन महिन्यांपासून थकले असल्याने नगर जिल्ह्यातील १०५१ कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. या कलावंतांसाठीचा नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी अशा तीन महिन्यांचा एकूण ७१ लाखांचा निधी येणे बाकी आहे.

साहित्य, नाट्य व कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वृद्ध कलावंतांची निवड करून त्यांना दरमहा मानधन दिले जाते. राष्ट्रीय कलावंतांना 'अ' दर्जा, राज्यस्तरीय कलावंतांना 'ब' दर्जा आणि स्थानिक कलावंतांना 'क' दर्जा अशी कलावंतांची विभागणी केली जाते. 'अ' दर्जाच्या कलावंतांना ३७ हजार ८०० रुपये (दरमहा ३१५० रुपये), 'ब' दर्जाच्या कलावंतांना ३२ हजार ४०० (दरमहा २७००), तर 'क' दर्जाच्या कलावंतांना दर वर्षाला २७ हजार रुपये (दरमहा २२५०) मानधन देण्यात येते.

जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कलाकार निवड समितीमार्फत दर वर्षी कलाकारांची निवड होते. ज्या कलाकारांना वयोमानामुळे कला सादर करता येत नाही, त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो, अशा कलावंतांना या योजनेचा आधार मिळतो.

नगर जिल्ह्यात 'अ' दर्जाचे ६, 'ब' दर्जाचे ४, तर 'क' दर्जाचे १०४१ असे एकूण १०५१ लाभार्थी आहेत. त्या सर्वांचे नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी अशा तीन महिन्यांचे ७१ लाख १५ हजार ८५० रुपयांचे मानधन थकले आहे.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात मानधन मिळण्याबाबत कलावंत विचारणा करतात; परंतु मानधन थेट मुंबईतील सांस्कृतिक कार्य विभागातून लाभार्थ्यांच्या खात्यावर पडत असल्याने जिल्हा परिषदेकडे याची फारशी माहिती नाही.

## आठ दिवसांत मानधन मिळणार!

मानधन रखडल्याबाबत संबंधित विभागात विचारणा केली असता, नोव्हेंबर व डिसेंबरचे मानधन येत्या आठ दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल, अशी माहिती मिळाली.

सदर योजनेत थेट शासनाकडून मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग होते. नोव्हेंबरपर्यंतचे मानधन वर्ग झालेले आहे. उर्वरित मानधन मिळण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

-देवीदास कोकाटे, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

## दिले जाणारे मानधन

राज्यस्तरीय कलावंत: दरमहा २७०० रुपये

राष्ट्रीय कलावंत: दरमहा ३१५० रुपये

जिल्हास्तरीय कलावंत: दरमहा २२५० रुपये

## नगर जिल्ह्यात

मानधन दिले जाणारे राष्ट्रीय कलावंत: ६

मानधन दिले जाणारे राज्यस्तरीय कलावंत: ४

मानधन दिले जाणारे जिल्हास्तरीय कलावंत: १०४१

लोकमत

# नऊ लाख लोकांना होऊन गेला कोरोना

## सेरो सर्व्हेचा अहवाल : कोरोना झाला, पण समजलेच नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेने (आयसीएमआर) आतापर्यंत तीन वेळा सर्वेक्षण केले आहे. तिसऱ्या टप्प्यात नगर जिल्ह्यातील ४३३ लोकांचे रक्तनुमने तपासले. त्यामध्ये ९८ जणांमध्ये कोरोनाच्या अँन्टीबॉडीज तयार होत असल्याचे स्पष्ट झाले. म्हणजे हे प्रमाण २२.०६ टक्के इतके आहे. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाशी तुलना केली असता तब्बल नऊ लाख लोकांना कोरोना होऊन गेला हे समजलेच नाही, असे स्पष्ट होत असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

'आयसीएमआर'च्या वतीने सीरो सर्वेक्षण करण्यासाठी राज्यातील बीड, परभणी, नांदेड, सांगली, अहमदनगर, जळगाव हे सहा जिल्हे निवडले होते. २१ ते ३० मे दरम्यान पहिला टप्पा, २४ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर रोजी दुसरा टप्पा, २३ ते २९ डिसेंबरदरम्यान तिसरा टप्पा झाला. या सर्वेक्षणात नागरिकांमध्ये कोरोनाशी लढणाऱ्या अँन्टीबॉडीज तयार होत आहेत का, याचे संशोधन करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्यात ४३३ लोकांचे रक्तनमुने तपासण्यात आले. त्यामध्ये ९८ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आला. हे प्रमाण २२.०६ टक्के आहे.

या प्रमाणाशी एकूण लोकसंख्येशी तुलना केली असता तब्बल ९ लाख ९२ हजार ७०० लोकांमध्ये या अँन्टीबॉडीज तयार होत असल्याचे दिसते आहे. म्हणजे एवढ्या लोकांना कोरोना होऊन गेला, हे समजलेच नाही, असेच या अहवालाचा अर्थ असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांमध्येही सेरो सर्वे करण्यात आला. नगर जिल्ह्यात १०३ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले. त्यामध्ये २१ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. हे प्रमाण २०.०४ टक्के आहे. कोरोनाविरोधात लढण्याची प्रतिकारशक्ती वाढत असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यात आतापर्यंत ३ लाख १० हजारांच्यावर कोरोना चाचण्या झालेल्या आहेत. त्यातील १८ टक्के लोकांचाच अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ७३ हजार ३५० जण कोरोनाबाधित झाले आहेत.

### सेरो सर्वे अहवाल

| कोणाचा | चाचणी | पॉझिटिव्ह | प्रमाण |
|---|---|---|---|
| सामान्य नागरिक | ४३३ | ९८ | २२.०६ |
| हेल्थ केअर | १०३ | २१ | २०.०४ |

नगर जिल्ह्यात तीन टप्प्यांत सेरो सर्वे झाला. लोकांमध्ये प्रतिकारशक्ती वाढते की नाही, हे तपासण्यासाठी हा सर्वे होता. जिल्ह्यात २२ टक्के लोकांमध्ये इम्युनिटी वाढली आहे. याचाच दुसरा अर्थ त्यांना कोरोना होऊन गेला, असेही म्हणता येईल. हा सर्वे रँडम असतो. त्यामुळे त्याचा नक्की काय निष्कर्ष असेल, हे सांगणे कठीण आहे.

**- डॉ. सुनील पोखरणा,**
जिल्हा शल्यचिकित्सक

### सेरो सर्वेक्षण कशासाठी ?

उच्च जोखीम असलेले आरोग्य सेवा कर्मचारी, कामगार, इम्युनो कॉम्प्रोमाईज्ड व्यक्ती, कटेन्मेंट झोनमधील व्यक्ती संक्रमित झाल्या होत्या काय? हे सर्वेक्षणातून स्पष्ट होते. तसेच रँडम पद्धतीने नागरिकांच्या रक्तनमुन्यांची तपासणी करून त्यांच्यामध्ये अँन्टीबॉडीज तयार झाल्या आहेत काय? सामूहिक प्रतिकारशक्तीची माहिती होऊन उपाययोजनांची दिशा ठरविण्यासाठी प्रतिकार शक्तीचे अनुमान बांधले जाते व संसर्ग प्रमाणाचा अंदाज कळतो.

### जिल्ह्यात कुठे झाला होता सर्वे

केळूंगण, कासार दुमाला, नांदुर्खी खुर्द, मडकी, शेवगाव, कोंडगाव, वासुंदे, मधेवडगाव, संगमनेर, अहमदनगर, राशिन, बारडगाव सुद्रिक, मिरजगाव, कुळधरण.

पुढारी

# वाळू ठेकेदारांपुढे प्रशासन हतबल!

## जिल्ह्यातील १७ लिलावाकडे फिरविली पाठ; तिसऱ्या फेरीनंतर शासकीय किंमतीत २५ टक्के कपातीची तरतूद

**नगर : गोरक्षनाथ बांदल**

जिल्ह्यात यावर्षी सरासरीच्या दुप्पट पाऊस झाल्याने, सर्वच नद्या पुराने दुथडी वाहिल्याने नदीपात्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाळू आली आहे. राज्य पर्यावरण समितीने जिल्ह्यातील १८ वाळू घाटांचा लिलावाच्या मंजुरी दिली आहे. या लिलावातून २७ कोटी ५९ लाख ७४ हजार ६५० रुपयांचा महसूल उपेक्षित आहे. मात्र, वाळू ठेकेदारांनी या लिलावाकडे पाठविल्याने, आतापर्यंत कोपरगाव तालुक्यातील सोनारी-कोळगावथडी या एकाच वाळू घाटाचा लिलाव झाला आहे. उर्वरित १७ वाळू घाटांसाठी आता तिसऱ्यांदा लिलाव होत आहे. तिसऱ्या फेरी अखेर ठेक्याची किंमत २५ टक्के कमी करण्याची तरतूद असल्याने, आतातरी ठेकेदारांचा प्रतिसाद मिळणार का, असा प्रशासनासमोर प्रश्न आहे.

जिल्ह्यात यावर्षी दुप्पट पाऊस झाला आहे. जिल्ह्यातील प्रमुख नद्यांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात पाणी आहे. गोदावरी, मुळा, प्रवरा या उत्तर जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. या नद्यांच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वाळू आली आहे. जिल्ह्यातील दक्षिण भागातील घोड, भीमा, सीना पात्रातही मोठ्या प्रमाणावर वाळू आली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने नदीपात्रातील वाळू साठ्याची मोजदाद केली जाते. जिल्हा गौण खनिज विभाग, भूजल सर्वेक्षण विभाग आणि महसूल विभागाचे अधिकारी एकत्रितपणे वाळू घाटांची लांबी,रुंदी, खोली या बाबींची मोजणी करून



वाळूचा साठा ठरवितात. वाळू ब्रास आणि सध्याची बाजारभावाप्रमाणे किंमत ठरविली जाते. या वाळू घाटांच्या लिलावासाठी जिल्हास्तरीय पर्यावरण समितीकडे प्रस्ताव पाठविला जातो. राष्ट्रीय हरित लवादाने वाळू घाटांच्या लिलावासाठी राज्य पर्यावरण समितीची मंजुरी बंधनकारक केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील १८ घाटांचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यास समितीने मंजुरी दिलेली आहे.

जिल्ह्यातील वाळू घाटांचे प्रस्ताव याप्रमाणे : वांगी खुर्द, नायगाव, मातुलठाण गावातील ३ घाट (ता. श्रीरामपूर), कोकमठाण, सवंत्सर, सोनारी, कोळगावथडी, जेऊर कुंभारी, जेऊर पाटोदा, सांगवी भुसार, सुरेगाव, गोधेगाव (ता. कोपरगाव), राहुरी खुर्द, पिंप्री वळण, चंडकापूर, वळण, रामपूर, सात्रळ (ता. राहुरी), पुणतांबा, रस्तापूर (ता. राहाता) येथील लिलावासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. जानेवारी महिन्यात जिल्ह्यातील १८ वाळू घाटांचा लिलाव झाला. हे लिलाव ई-निविदा पद्धतीने होतात. पहिल्या लिलावात कोपरगाव तालुक्यातील सोनारी-कोळगावथडी या घाटाचा लिलाव गेला. त्यानंतर उर्वरित १७ वाळू घाटांच्या लिलावाला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दि.५ फ `ब्रुवारी रोजी दुसऱ्यांदा लिलावाची निविदा उघडण्यात आली. या लिलावासही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तिसऱ्यांदा ई-निविदा मागविण्यात आली आहे. दि.२३ फ `ब्रुवारी रोजी ही निविदा उघडली जाणार आहे.

गौण खनिज कायद्यातील तरतुदीनुसार तिसऱ्यांदा लिलावास प्रतिसाद न मिळाल्यास ठेक्याची मूळ किंमत २५ टक्के कमी करण्याचा अधिकार विभागीय महसूल आयुक्तांना आहे. वाळू ठेकेदार हे शासकीय किंमत कमी होण्याची वाट पाहत असतात. त्यामुळे लिलावास प्रतिसाद मिळालेला नाही. ठेकेदारांच्या या संगनमतापुढे प्रशासन यंत्रणा हातबल ठरताना दिसत आहे.

Ahmednagar Edition
Feb 12, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# नगरमध्ये ४८ ठिकाणी होणार लसीकरण

नगर, दि. ११ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांसह खासगी वैद्यकीय क्षेत्रातील सर्वांना एकाचवेळी जिल्ह्यात कोरोना लसीकरणाची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे. यात ४ हजार ७५२ जणांना ४८ केंद्रांवर लसीकरण करण्याचे नियोजन जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

नगर जिल्ह्यासाठी लसीचे ३२ हजार ९०० डोस उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी महापालिका क्षेत्रासाठी ७ हजार ५०० व लष्करातील आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी ३१०, तर उर्वरित २५ हजार ४०० डोस ग्रामीण भागासाठी दिले आहेत. जिल्ह्यात १६ जानेवारीपासून आजअखेरपर्यंत २० हजार

करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे आरोग्याधिकारी डॉ. संदीप सांगळे यांनी दिली.

महापालिका हद्दीत आठ, जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकूण १४ ठिकाणी लसीकरण करण्यात येत आहे. याबरोबरच एक दिवसासाठी जिल्ह्यातील ४८ ठिकाणी लसीकरण होणार आहे. त्यात प्रत्येक केंद्रावर १०० लसीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## येथे होणार लसीकरण

**नगर :** वाळकी, चास, जेऊर. **अकोले :** ब्राह्मणवाडा, कोतुळ, विठे, म्हाळादेवी, शेंडी. **जामखेड :** अरणगाव. **कोपरगाव :** पोहेगाव, दहेगाव बोलका, टाकळी, ब्राह्मणगाव. **कर्जत :** कुळधरण, राशीन, मिरजगाव. **नेवासे :** नेवासे खुर्द, टोका, सोनई. **संगमनेर :** बोटा, धांदरफळ, निमगाव जाळी. **पारनेर :** रुईछत्रपती, भाळवणी, अळकुटी, खडकवाडी. **पाथर्डी :** मिरी, खरवंडी कासार, तिसगाव. **शेवगाव :** हातगाव, दहेगाव बोलका. **राहुरी :** मांजरी, देवळाली प्रवरा, उंबरे. **राहाता :** दाढ, अस्तगाव, डोऱ्हाळे, सावळीविहीर, वाकडी, कोल्हार, लोणी, पुणतांबे. **श्रीगोंदे :** आढळगाव, लोणी व्यंकनाथ, बेलवंडी, कोळगाव. **श्रीरामपूर :** बेलापूर, उंदीरगाव,